सांज महानगरी

शनिवार, दि. २० डिसेंबर २०१४, वर्ष : ५ अंक : १९३ पाने ८ मुंबई आवृत्ती

# डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्ट थरारक वीकेण्डकरिता सुयोग्य स्थळ

**पुणे । प्रतिनिधी**

तुम्हाला तुमचा वीकेण्ड मजेत व्यतीत करायचा असेल तर व्यवसाय जगतातील प्रख्यात आणि लोकप्रिय व्यक्तिमत्त्व श्री. जिम्मी मिस्त्री (मुख्य डिझायनर आणि व्यवस्थापकीय संचालक) यांच्या संकल्पनेतून प्रत्यक्षात आलेले डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्ट अतिशय योग्य जागा आहे. डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमधील सोयीसुविधा आणि त्याची रचना इतकी उत्कृष्ठ आहे की देशातील सर्वोत्कृष्ठ रेसॉर्ट्‌र्समध्ये याची सहज गणना होऊ शकेल. या रेसॉर्टमधील, विशेषतः लक्झरी रूम्समधील आरामदायीपणा असो या सोयीसुविधा असोत, कशातही कोणत्याही पद्धतीची तडजोड केली गेलेली नाही.

येथील खाद्यानुभव आणि सेवा हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. येथील जेवण अतिशय उत्कृष्ठ आणि स्वादिष्ट असून येथील कर्मचारी वर्ग सतत तुमच्या दिमतीस हजर असतो. वीकेण्ड व्यतीत करण्याचे स्थळ असलेल्या डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमध्ये भारतात याआधी कधीही न पाहिल्या गेलेल्या अनेक ॲडव्हेन्चर उपक्रमांची रेलचेल आहे.

श्री. मिस्त्री अभिमानाने म्हणाले, हे जागतिक दर्जाचे एक्स्ट्रीम ॲडव्हेन्चर पार्क असल्याने भारताला आपसूकच आंतरराष्ट्रीय ॲडव्हेन्चर जगतात ओळख प्राप्त होते. ४३ एकर्सवर पसरलेल्या या रेसॉर्टमध्ये १०० निरनिराळे ॲडव्हेन्चर उपक्रम असून येथील पंचतारांकीत रेसॉर्ट्स, आलिशान व्हिला आणि बँक्वेटींगचे अनेक पर्याय पाहता यांसारखे दुसरे पार्क नाही असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. तुम्हाला हे रेसॉर्ट पूर्णपणे अनुभवून पाहायचे असेल तर तुम्हाला किमान दोन दिवस काढून यावे लागेल. उत्तम, उमदे मनोरंजन काय असते याचा प्रत्यय इथे येतो. एखाद्या संस्थेला किंवा कुटुंबाला मनोरंजनाकरिता काय हवे असते ते सर्व काही इथे उपलब्ध आहे. आकार, खेळ, वैविध्य, सोयीसुविधा आणि आलिशानपणा यांच्या संदर्भात पाहता हे भारतातील पहिलेवाहिले रेसॉर्ट ठरेल. आम्ही तुमच्याकरिता खरोखरीचे जागतिक दर्जाचे ॲडव्हेन्चर रेसॉर्ट देऊ केले आहे.

डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमध्ये असलेल्या १००हून अधिक ॲडव्हेन्चर उपक्रमांमध्ये एटीव्ही, फ्लाईंग फॉक्स, डर्ट बाईक्स, स्वूप, ॲक्वा झोर्बिंग, लँड झोर्बिंग, रोलर झोर्ब, जंगल कॅम्प, रॉकेट इजेक्टर, पेण्टबॉल, रेडीयो कंट्रोल्ड कार्स, रेडीयो कंट्रोल्ड प्लेन्स आणि रेडीयो कंट्रोल्ड हेलिकॉप्टर्स तसेच हार्ड बॉल क्रिकेटचा समावेश आहे.

तसेच, डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमध्ये तुमच्या पाळीव प्राण्याचीही सर्वतोपरी काळजी घेतली जाते. पाहुण्यांना आपल्या वास्तव्यादरम्यान आपल्या पाळीव प्राण्यालाही आपल्यासोबत ठेवून घेता येणार आहे. डेल्ला ॲडव्हेन्चर मधील दूध देणाऱ्या जर्सी गाई हा देखील तुमच्याकरिता एक अनोखा अनुभव ठरू शकतो. डेल्ला ॲडव्हेन्चर पार्कमधील जर्सी गाई हा गाईचा दुर्मिळ वाण असून तो सर्वप्रथम इंग्लंड चॅनलमधील जर्सी बेटांवर विकसित केला गेला होता. बटर तयार करता येईल असे दूध देणाऱ्या गाई म्हणून जर्सी गाई विख्यात आहेत. डेल्ला ॲडव्हेन्चरमधील डॉग वॉकिंगची सुविधा देखील देऊ केली गेल्याने या रेसॉर्टमधील वास्तव्याचा अनुभव भावनिकरित्या पूर्णत्व देणारा आणि खऱ्या अर्थाने मनोरंजक ठरावा.या रेसॉर्टमध्ये डेल्ला लक्झरी रेसॉर्ट, कँप डेल्ला रेसॉर्ट आणि डेल्ला ॲडव्हेन्चर रेसॉर्ट अशा तीन वर्गवार्यांअंतर्गत १२५ आलिशान खोल्या पुरवण्यात आल्या आहेत.